Special Issue Vol-01, Jan. to March 2021

# Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# New Agriculture Acts 2020 : Problems and Prospects



**Chief Editor**
Dr.Bapug Gholap
**Editor**
Dr. Omprakash Kshirsagar
**Co-Editor**
Dr. Madan Shelke

28] NEW AGRICULTURAL ACTS 2020: Problems & Prospects
**Vidyasagar Ubale, Mumbai** ||123

29] Review Article: Advantages and Disadvantages of Indian Agriculture Acts 2020.
**Sulabha Sambhaji Lalsare, Nashik** ||128

30] New Agriculture Acts-2020 and its Impact on APMC & MSP
**Dr. D. J. Kande, Buldana** ||133

31] Rashtriya Krishi Vikas Yojana in India: A Study
**Dr. T. P. Shashikumar[1]** ||139

32] 'किसान कृषि विधेयक' के परिप्रेक्ष्य में
**प्राचार्य डॉ.विलास कांबळे, अहमदपूर जि.लातूर** ||144

33] कृषी कानून और समिक्षा
**प्रा.डॉ. देशमुख चंद्रशेखर जरासंध, उदगीर जि. लातूर** ||149

34] कृषी कायदे व शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य!
**डॉ.विकास विनायकराव सुकाळे, नांदेड** ||152

35] भारतातील नवीन कृषी कायदा २०२० आणि कृषी विपणन
**प्रा.रामदास गादगे, पुणे** ||156

36] नविन कृषी कायदे आणि शेतक-यांचे सक्षमीकरण: एक दृष्टीक्षेप
**प्रा. डॉ. परशुराम पाटील, हिंगोली** ||161

37] नवीन कृषी कायद्यातील प्रमुख तरतुदी
**प्रा.डॉ.शेळके मदन लक्ष्मण,प्राचार्य, डॉ. बी.डी. खंदारे** ||163

38] नवीन कृषी कायदे २०२० आणि करार शेती : एक अभ्यास
**जामकर अल्का रानबा, उदगीर जि.लातूर** ||166

39] नविन कृषी कायदे २०२०: शेतकरी संघर्ष
**स.प्रा.एन. एस. गेडाम, सिल्लोड जि. औरंगाबाद** ||168

40] कृषी कायदा २०२० कायद्याला विरोध का?
**प्रा. डॉ. भुजंग पाटील, शिरुर ताजबंद** ||172

41] **नवीन कृषी विधेयक आणि शेतकऱ्यांमध्ये असंतोष**
**Prof. B-J-Gaikwad- Hingoli** ||175

यावे.

२. आयात निर्यात धोरण तसेच शेतकरी मालास दिला जाणारा भाव या सर्वांचा विचार करून कायदे तयार करावे.
३. देशातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतमालास किमान हमीभावाची तरतुद करावी.
४. शेतकऱ्यांना पीक विमा देताना शेतकऱ्यांचे कष्ट तसेच त्यांनी केलेला खर्च याच्या किमान दुप्पट असावा.
५. भारतीय शेतकऱ्यांना किमान दोन लाख रुपयाचे कर्ज कोणत्याही व्याजाशिवाय देण्यात यावे.

वरील प्रमाणे कृषी कायदा २०२० आणि त्याला होत असलेल्या विरोधाचा विचार इथे केला आहे कोरडा सारखी अत्यंत बिकट परिस्थिती असताना गेल्या तीन महिन्यापासून देशातील शेतकरी शेतकऱ्याच्या विरोधात असलेल्या कृषी कायद्यातील तरतुदी च्या अनुषंगाने केंद्रातील सरकार विरोधात आंदोलन करीत आहे हे आंदोलन अतिशय बिकट काळात असून कधीकधी हिंसाचाराच्या मार्गाने जाताना दिसते यावरून असे म्हणता येईल की निश्चितपणे या कायद्याच्या या निमित्ताने सरकारने ज्या तरतुदी लागू केले आहेत त्याचा पुन्हा सर्व शेतकरी संघटना आणि घटक पक्षांना एकत्र घेऊन पुनर्विचार करावा जेणेकरून शेतकरी, शेती, व्यापारी तसेच देशातील समग्र जनतेच्या दृष्टीने ते हिताचे असेल. त्याचप्रमाणे विरोधी पक्ष, शेतकरी संघटना यांनी हा मुद्दा प्रतिष्ठेचा किंवा राजकारण तसेच व्यक्तिगत स्वार्थाचा न ठरवता शेती आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या बाजूने एकत्र येऊन कायद्याच्या दुरुस्ती तसेच अंमलबजावणीच्या अनुषंगाने विचार करावा असेही मला नमूद करावेसे वाटते.

**संदर्भ**

१. विविध वृत्तपत्रे, साप्ताहिके, नियतकालकांमधून वेळोवेळी प्रकाशित झालेली माहिती.
२. T- V-/ Internet या माध्यमातून हाती आलेली माहिती.

❑❑❑

**41**

# नवीन कृषी विधेयक आणि शेतकऱ्यांमध्ये असंतोष

**Prof. B-J-Gaikwad**
Assistant Professor [Department of Economics]
Toshniwal Arts, Commerce & Science College,
Sengaon, Dist- Hingoli

***********

**सारांश:**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशाच्या जीडीपी मधील कृषीचा हिस्सा जरी घटत असला तरी आजही सर्वाधिक रोजगार देणारं क्षेत्र म्हणून याकडं पाहिलं जातं. अशावेळी कृषीसंबंधी सरकारचा कोणताही निर्णय त्या क्षेत्रावर सकारात्मक वा नकारात्मक परिणाम करू शकतो. मोदी सरकारनं ह्ज्ह्ज पर्यंत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचं लक्ष्य ठेवलंय. त्यासाठी अनेक नव्या योजना आणि निर्णय घेण्यात आलेत. सप्टेंबरमध्ये संसदेत घाई—गडबडीत पारित करण्यात आलेले आणि नंतर कायद्यात रूपांतर झालेले तीन नवे कृषी कायदे सरकारच्या याच धोरणाचाच एक भाग.केंद्र सरकारच्या मते, या नव्या कृषी कायद्यांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडेल. असं असेल तर मग या कायद्याला शेतकर्यांमचा एवढा विरोध का होतोय? शेतकरी या कायद्याविरोधात एवढं आक्रमक का झालेत? दिल्लीतील शेतकऱ्यांच्या आंदोलनाचं वारं आता देशभर पसरलंय. हे पाऊल शेतकऱ्यांना का उचलावं लागतंय? त्यासाठी हा कायदा विस्तृतपणे समजून घेणं आवश्यक आहे.

**प्रमुख संकल्पना :नवीन विधेयक,किमान हमी भाव ,फायदे,तोटे**

**परिचय:**

लोकसभेत सरकारकडून शेतकऱ्यांच्या हितासाठी एक पाऊलप पुढे टाकताना तीन विध

ोयके संमत करण्यात आली. शेती उत्पन्न व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सुलभता) विधेयक, ह्यञ्ह्य़, शेतमाल हमी भाव आणि शेती सेवा करार (सबलीकरण आणि संरक्षण) विधेयक आणि अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) विधेयक, ह्यञ्ह्य़. जाणून घ्या या विधेयकांबद्दलशेती उत्पन्न व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सुलभता) विधेयक, या अंतर्गत सरकारची योजना आहे की असे तंत्रविकसित केले जाईल ज्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या आवडत्या ठिकाणी वस्तू विकता आल्या पाहिजेत. इतकंच नव्हे तर यानुसार शेतकरी दुसऱ्या राज्यांतील लायसन्सधारक व्यापाऱ्यांशी व्यापार करू शकतात. शेतमाल हमी भाव आणि शेती सेवा करार (सबलीकरण आणि संरक्षण) विधेयक — सरकारचा असा दावा आहे यामुळे कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगला नॅशनल फ्रेमवर्क मिळेल. याचा अर्थ शेतीशी संबंधित समस्या आता शेतकऱ्यांना येणार नाही तर कॉन्ट्रॅक्ट घेणाऱ्यांना असतील. दिल्लीत गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाला प्रजासत्ताक दिनी हिंसक वळण मिळालं आहे. दिल्लीच्या सीमांवर ट्रॅक्टर रॅली करण्याची परवानगी दिल्ली पोलिसांनी शेतकऱ्यांना दिली होती पण काही शेतकऱ्यांनी दिल्लीत घुसण्याचा प्रयत्न केला त्यामुळे पोलिसांना बळाचा वापर करावा लागला आहे.केंद्र सरकारने २० सप्टेंबर ह्यञ्ह्य़ रोजी कृषी क्षेत्राशी संबंधित तीन कायदे मंजूर केले. त्या कायद्यांना शेतकऱ्यांचा विरोध आहे आणि त्यासाठीचं हे आंदोलन सुरू आहे.

**कृषी संबधित नवीन विधेयकांची वैशिष्ट्ये :**

i) शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा ह्यञ्ह्य़

ii) शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदाह्यञ्ह्य़

iii ) अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा ह्यञ्ह्य़

शेतकरी आंदोलनाबाबत तुम्हाला पडलेले ऌ बेसिक प्रश्न आणि त्यांची ऌ सोपी उत्तरं

घ. शेतकरी आंदोलनासाठी पैसा येतोय तरी कुठून?

ह्य. दिल्लीत शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर रॅलीला हिंसक वळण, शेतकरी आणि पोलिसांत संघर्ष इतके दिवस शांतपणे सुरू असलेल्या आंदोलनाने रौद्र रूप ध ारण केल्याचं दिसत आहे.

MSP बाजर समित्यांचं अस्तित्व आणि कंत्राटी शेती हे मुद्दे प्रामुख्याने शेतकऱ्यांनी घेतलेल्या आक्षेपांच्या आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहेत. त्यामुळे शेतकरी हे तिन्ही कायदे पूर्णपणे मागे घेण्याची मागणी करत आहेत.

**शेतकरी उत्पादने व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा:**

या कायद्यात दोन मुख्य मुद्दे आहेत. एक म्हणजे शेतकऱ्यांना देशभरात कुठेही आपल्या मालाची विक्री करता येणार आहे. दुसरं म्हणजे खासगी बाजार समित्या स्थापन करण्याला मान्यता दिली गेली आहे. भारतात कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा पारित करण्यात आला. त्याअंतर्गत सध्या देशभरात जवळपास ऌ००० बाजार समित्या आहेत. शेतकरी या ठिकाणी आपल्या मालाची विक्री करू शकतो. या बाजार समित्यांमधे अनेक त्रुटी आहेत. बाजार समित्या म्हणजे शेतकऱ्यांचे शोषण करणार्याय समित्या अशा प्रकारचे चित्र निर्माण झालं आहे. याचं एकमेव कारण म्हणजे तिथले दलाल किंवा आडते. सरकारी लायसन्स असलेले हे दलाल शेतकऱ्यांच्या मालाची अल्प किंमत ठरवतात आणि भरमसाठ किंमतीनं त्यांची विक्री करतात.

**नव्या कायद्यात बदल काय?**

केंद्र सरकारच्या नव्या कायद्यानुसार शेतकऱ्यांना आपल्या मालाची विक्री करण्यासाठी आता दलालांची गरज नाही. शेतकरी त्यांचा माल थेट कंपन्यांना विक्री करू शकतो. कागदोपत्री हा कायदा आदर्श असाच आहे. पण याचा परिणाम उलटाच होण्याची जास्त शक्यता आहे. भारतात ८५ टक्के शेतकरी हे लहान किंवा सीमांत शेतकरी आहेत. ग्रामीण भागात एक एकर, दोन एकर अशा तुकड्यत शेती आहे. जेवढी जास्त शेती तेवढी खाजगी कंपनीशी बार्गेनिंग करण्याची क्षमता जास्त. या नियमानुसार त्या लहान शेतकऱ्यांना बार्गेनिंग

पॉवर राहणार नाही. कंपन्या ज्या भावात खरेदी करतील तो पडता भाव शेतकऱ्यांना घ्यावा लागेल. शेती उत्पादन ही नाशवंत असतात. शेतकऱ्यांकडे मालाच्या साठवणुकीची क्षमता नाही. त्यामुळे पडेल त्या किमतीला आपला माल विक्री केल्याशिवाय त्याला गत्यंतर राहणार नाही. या ठिकाणी मालाची खरेदी करणारा शक्तिशाली आणि विक्री करणारा दुर्बल अशीच स्थिती आहे.दुसरं म्हणजे खाजगी बाजार समित्या किंवा मंड्य स्थापन करण्याला परवानगी. यांची स्थापना झाली तर सरकारी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे व्यवहार कमी होतील. असं झालं तर मग सरकार त्यांच्यावर खर्च कशाला करेल? भविष्यात या सध्याच्या बाजार समित्या बंद झाल्या तर शेतकऱ्यांसमोर दुसरा कोणताही पर्याय राहणार नाही. या बाजार समित्यांच्या व्यवहारांवर राज्य सरकार कर लावते. त्या महसूलालाही राज्यांना मुकावं लागेल. कारण खासगी मंड्यांवरवर हा कर लावण्यात येणार नाही. याचा फायदा घेऊन बड्य कंपन्या कर चोरी करू शकतात. शेतकरी देशभरात कुठेही त्यांच्या मालाची विक्री करू शकतो, त्याला आम्ही स्वतंत्र केलं असा दावा केंद्र सरकार करतंय. पण यापूर्वीही शेतकरी देशभरात कुठेही त्यांचा माल विकू शकत होता. नागपूरची संत्री, नाशिकचे द्राक्षे, पंजाबचा गहू यांचीही विक्री सध्या देशभरात होतेच. मग सरकारने असा कोणता नवीन निर्णय घेतलाय? महत्त्वाचा मुद्दा हा मालाची वाहतूक आणि साठवणूक हा आहे. तो खर्च या सीमांत शेतकऱ्यांना जमणार नाही. त्यामुळे कागदोपत्री हा कायदा चांगला दिसत असला तरी सीमांत शेतकऱ्यांना याचा काहीच फायदा होणार नाही.

**शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) हमीभाव करार — कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग**

या कायद्यामध्ये कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगला कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आता कंपन्यांना शेतकऱ्यांशी थेट करार करता येणार आहे. पिकांच्या लागवडीपूर्वीच शेतकऱ्यांना त्यांचा मालाची फिक्स अशी किंमत मिळत असेल तर ती खूप चांगली गोष्ट आहे. कारण शेती उत्पादनांच्या किंमतीतील चढ— उतारामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होतं.

पण या कायद्यात एक त्रुटी आहे. कॉन्ट्रॅक्ट संबंधी कंपनी आणि शेतकऱ्यांत काही वाद झाल्यास त्याची तक्रार उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे करण्यात येईल. हे प्रकरण वीस दिवसात निकाली काढण्याचं बंधन उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना आहे. समजा हा निकाल शेतकऱ्याच्या विरोधात केला तर त्याला पुढे दाद मागण्याचा कोणताही अधिकार नाही. एका रात्रीत कागदोपत्री तयार होणाऱ्या कंपन्या आणि कॉन्ट्रॅक्ट मधील बारकावे यांचं गणित शेतकऱ्याला समजणार नाही. मग सरकार त्यांचं संरक्षण कसं करणार? सध्या कृषी मालाच्या विक्रीसाठी जिओ मार्ट सारख्या अनेक मोठ्य कंपन्या बाजारात उतरल्या आहेत. त्यांच्याकडं मोठं भांडवल आहे म्हणून सध्या त्यांना चांगला भाव द्यायला परवडतो. पण हे मॉडेल शाश्वत नाही. याचं उदाहरण म्हणजे घ्मेझॉन.

**कृषी सुधारणा विधेयकं : फायदे व तोटे**

संसदेत तीन कृषी सुधारणा विधेयके पारित होताच देशातील कृषी क्षेत्रासाठी एक नवीन सुरवात झाली. ही तिन्ही विधेयके केंद्रीय कृषी मंत्रालया अंतर्गत येत असली तरी वेगवेगळी आहेत. एक विधेयक हे कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सहाय्य) विधेयक आहे, हे कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी)ला पर्यायी व्यवस्था देणाऱ्या कायद्याचे आहे. दुसरे विधेयक हे शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) हमीभाव करार व कृषी सेवा विधेयक (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) संदर्भातले आहे. तर तिसरे विधेयक हे अत्यावश्यक वस्तू(सुधारणा) विधेयक हे कृषीमाल साठवण मर्यादा संदर्भातले आहे. या तिन्ही विधेयकांची वेगवेगळी विशेषता व वेगवेगळ्या तरतुदी आहेत. मात्र या सुधारणा विधेयकातून शेतकऱ्यांचे हित जपले जाईल .

नवीन कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य विधेयकावरील आक्षेप नवीन कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सहाय्य) या विध ेयकानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती व्यतिरिक्त

पर्यायी व्यवस्था उभी करण्याचा हेतू आहे. या कायद्यानुसार शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार मिळाला आहे. सोबतच शेतकऱ्यांना खुल्या बाजारात आपला शेतमाल कुठूनही (शेतातून), कुठेही (देशात व देशाबाहेर) व कोणालाही विकण्याचा अधिकार मिळाला आहे. या व्यतिरिक्त कृषी उत्पन्न बाजार समितीचा पर्याय देखील उपलब्ध असणार आहे. मात्र या नवीन कायद्यात काही बाबीत स्पष्टता नाही. कायद्यात काही पळवाटादेखील आहेत. नवीन कायद्यानुसार शेतमाल खरेदीविक्री व्यवहारात शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची शाश्वती दिसत नाही. दुसरी गोष्ट शेतकरी व व्यापारी यांच्यात खरेदी–विक्री व्यवहार झाल्यानंतर पुढे शेतमालाचे भाव पडले व व्यापाऱ्याने ठरल्या भावाने शेतकऱ्यांचा शेतमाल उचलण्यास नकार दिल्यास नवीन कायद्यात त्यावर उपयोजना दिसत नाही. महत्वाचे म्हणजे कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सहाय्य) या कायद्यात हमीभावाचा कुठेही उल्लेख नाही. शेतीमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार शेतकऱ्यांना आहे, पण या अधिकाराचा शेतकरी वापर कसा करेल? शेतकरी आपली बार्गेनींग पावर(सौदेबाजी क्षमता) कोणत्या आधारावर टिकवून ठेवेल ? याची स्पष्टता या कायद्यात दिसत नाही, शेवटी अडती(दलाल) यांच्या तावडीतून शेतकऱ्यांची सुटका होईल पण अडत्यांचा हिस्सा शेतकऱ्यांना कसा मिळेल? शेतकऱ्याचे अंतिम हित कसे जपले जाईल? याची पूर्ण शाश्वती या नवीन कायद्यात दिसत नाही. नवीन कृषी उत्पादन व व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व साहाय्य) सुधारणा विधेकातून नवीन व्यवस्था उभी राहणार आहे. या सोबतच कृषी उत्पन्न बाजार समितीची जुनी व्यवस्था देखील समांतरपणे अस्तित्वात राहणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आणखी गोंधळ वाढण्याची शक्यता नाकारत येत नाही. व्यापाऱ्यांना ज्या व्यस्थेत जास्त फायदा दिसेल तिकडे ते ध ाावतील पण शेतकऱ्यांचे काय? ते या दोन्ही व्यवस्थेच्या मध्ये भरडणार नाही याची भीती नाकारता येत नाही. हमी भाव करार व कृषी सेवा विधेयक (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) दुसरे विधेयक हे शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) हमीभाव करार व कृषीसेवा विधेयक (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) कायद्या संदर्भातले आहे. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये कंपनी, उद्योजक, व्यापारी व इतर कोणीही शेतकऱ्यांसोबत करार करून शेती करू शकतो. कॉन्ट्रॅक्ट हा शेतकऱ्यांच्या शेतीचा नसेल तर पिकाचा असणार आहे. कायद्यानुसार कोणत्या वाणाचे कोणते पीक घ्यायचे हे कॉन्ट्रॅक्टर शेतकऱ्यांना आधी सांगणार आहे. शेतकऱ्याला याचा किती भाव द्यायचा हे देखील कॉन्ट्रॅक्टर शेतकऱ्याला आधीच सांगणार आहे. एक मत झाले तर कॉन्ट्रॅक्ट अस्तित्वात येईल .

कॉन्ट्रॅक्टमध्ये शेती खर्चाचे विवरण, इतर खर्चाचे विवरण नमूद असेल व ठरल्याप्रमाणे कॉन्ट्रॅक्ट अस्तित्वात येईल. या कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये शेतकऱ्यांसाठी अनेक सूट देण्यात आल्या. शेतमाल विक्रीच्या वेळी कॉन्ट्रॅक्टपेक्षा बाजारभाव जास्त असला तर त्याचा वाढीव हिस्सा शेतकऱ्यांना मिळण्याची तरतूद या कायद्यात आहे. शेतकऱ्यांना कॉन्ट्रॅक्ट काळात कधीपण बाहेर पडण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये काही वाद निर्माण झाला तर शेतकऱ्यांना उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे दाद मागण्याचा पर्याय असणार आहे. उपविभागीय दंडाधि ाकाऱ्यांना २० दिवसांच्या आत असे प्रकरण निकाली काढणे बंधनकारक असणार आहे . दुसरी गोष्ट उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचा निकाल शेतकऱ्याचा विरोध ाात गेला तर दुसरीकडे दाद मागण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नाही. या कायद्यात उपविभागीय दंडाधि ाकारी हे शेतकऱ्यांच्या बाजूने असेल असे गृहीत ध ारण्यात आल्याचे दिसत आहे. पण प्रश्न हा आहे की आपल्याकडे किती शेतकरी जागृत व सुशिक्षित आहे, ज्यांना कॉंट्रॅक्टचे बारकावे आणि अटी वेळेत लक्षात येतील? जगात कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगचे प्रयोग फसले असतांना या नवीन कायद्यानुसार शेतमालाची साठवणूक करण्यासंदर्भात कोणतीही मर्यादा नसणार आहे. त्यामुळे उद्योजकांना या कायद्याच्या आधाराने कृषी व्यवसायात

थेट प्रवेश मिळेल. उद्योजक व व्यापारी हे मोठा साठा करून नफेखोरीसाठी या कायद्याचा दुरुपयोग करू शकतात. कमी भावात शेतकऱ्याकडून शेतमाल खरेदी करायचा व भरमसाठ साठेबाजी करून नफेखोरीसाठी बाजारात शेतमालाचा तुटवडा निर्माण करायचा, असे व्यापाऱ्यांनी व उद्योजकांनी ठरवले तर यावर नियंत्रण कसे आणायचे याची स्पष्टता या नवीन अत्यावश्यक वस्तू(सुधारणा) विधेयक कायद्यात दिसत नाही. ही मोठी उणीव या कायद्यात दिसत आहे.

**समारोप**

नवीन कायद्याने एपीएमसी अडत व्यवस्था कोलमडली तर भविष्यात ही हक्काची अर्थपुरवठा करणारी व्यवस्था बंद होईल अशी भीती उत्तर भारतातील या शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे हे शेतकरी या नवीन कृषी सुधारणा कायद्यांना विरोध करत आहेत. या तिन्ही नवीन कायद्याचे केंद्रबिंदू शेतकरी, व्यापारी, अडती(दलाल), ग्राहक व कॉन्ट्रॅक्टर आहे. या पाच घटकांवर या कायद्याचा परिणाम होणार आहे. यापैकी ग्राहक व व्यापारी यांच्यावर होणारा परिणाम शून्य किंवा नाममात्र असणार आहे. अडती(दलाल) या नवीन व्यवस्थेतील पळवाटेत स्वत:ला समायोजित( ॲडजस्ट) करून घेईल. कॉन्ट्रॅक्टर हा या क्षेत्रातील नवीन वर्ग आहे. त्यामुळे त्यांच्यावर काय परिणाम होईल हे आज सांगता येणार नाही. कायदे अमलात आल्यानंतर कायद्यातील त्रुटी सर्वांच्या लक्षात येईलच. त्या दूर करतांना केंद्र सरकारने प्रामाणिकपणे व विरोधी पक्षांनी एकत्रितपणे शेतकरी व ग्राहकांचे हित लक्षात घेत या कायद्यांत अपेक्षित सुधारणा करून घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

१. https%//ruralindiaonline-org/en/library/resource/the&farmers&empowermen t&and&protection&agreement &on& price& assurance &and&farm &services& act &2020/\gclid¾ Cj0KCQ iA7NKBBhDBARIs
2- https%//www-applicationformpdf-com/kisan&bill&2020&pdf&in/
3- https%//pib-gov-in/PressReleasePage-aspÛ\PRID¾1656929

❑❑❑

**42**

# नवीन कृषी कायदा २०२०चे फायदे व तोटे

**डी. ई. खोजे**
सहायक प्राध्यापक
मॉडेल डिग्री कॉलेज, घनसावंगी

**प्रा. डॉ. आर. बी. सांगुळे**
प्राध्यापक व विभाग प्रमुख
मत्स्योदरी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अंबड

**********

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. देशात आजपर्यंत औद्योगिकीकरण करण्याचे मोठया प्रमाणात प्रयत्न झाले आहेत. मात्र शेती व्यवसायाचे स्थान अद्याप महत्त्वाचे आहे. शेती व्यवसाय हा उपजीविकेचे प्रमुख साधन, मोठया प्रमाणावर रोजगार पुरविणारा स्त्रोत, राष्ट्रीय उत्पन्नातील स्थान, कच्चामाल पुरविणारा प्रमुख स्त्रोत, शेती उत्पादनाचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील महत्त्व अशा अनेक बाबींमुळे महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच आर्थिक विकासाची जननी म्हणून शेती व्यवसायाकडे पाहिले जाते.

भारतात कृषी क्षेत्राचा विकास व्हावा या उद्देशाने अनेक कायदे व धोरणे तयार करण्यात आली. त्याचा देशातील शेती व शेतकरी यास फायदा झाला आहे. शेती क्षेत्रासाठी मागील वर्षी देशात नवीन कृषी कायदा २०२० हा लागू करण्यात आला. या कायद्यांतर्गत वेगवेगळे तीन कायदे कृषी व्यवसायाच्या दृष्टीने केले आहेत. शेती क्षेत्राच्या खरेदी विक्रीवरील सर्व बंधने उठविणे, शेतकऱ्यांना शेतीमाल अधिक किंमत मिळेल तिथे विकण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देणे, दलाल व व्यापाऱ्यांना आळा